# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परिपत्रक

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, विद्यापीठ परिसर व उपपरिसर धाराशिव, संचालक, संतपीठ पैठण व संचालक, गोपीनाथराव मुंडे ग्रामीण विकास व संशोधन संस्था यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एकत्रित वेतनावर नियुक्त केलेल्या कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची मुदत दि. ३० जुलै २०२५ रोजी संपुष्टात येत आहे. त्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता आपल्या विभागात नियुक्त केलेल्या कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांना दि. २५.०७.२०२५ रोजी संपन्न झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या नियमित बैठकीतील प्रस्ताव क्र. ०४ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या एका सत्रासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या विभागात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता नियुक्त केलेल्या एकत्रित वेतनावरील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक यांना दि. ३१.०७.२०२५ ते दि. ०६.०८.२०२५ पर्यंत सेवाखंड देवून त्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या एका सत्रासाठी मुदतवाढ देण्यात येणार असून सदरील कंत्राटी सहाय्यक प्राध्यापक यांना दि. ३१.०७.२०२५ ते दि. ०६.०८.२०२५ पर्यंत आपल्या विभागात बायोमॅट्रीक उपस्थिती नोदवू नये. सदर शिक्षकांकडुन हमीपत्र घेऊन दि.०७.०८.२०२५ पासुन विभागात रुजु करुन घ्यावे व तसा अहवाल आस्थापना विभागात सादर करावा.

कुलसचिव

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४ )(
संदर्भ क्र. आस्था/विभाग/२०२५-२६/16 )(
दिनांक २६-०७-२०२५ )(
28

या परिपत्रकाची प्रत सर्व संबधितांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

D:/Officedata/advtcontractualRs.24000/ advtcontractual2025Rs.32000/Note2025